नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ११/०१/२०२६ (रविवार )

## अवैधरित्या अंमली पदार्थ गांजा विक्रीकरीता साठवणूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ०१ किलो ०६७ ग्रॅम गांजा जप्त
## काटोल पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन काटोल :– दिनांक १०/०१/२०२६ रोजी काटोल पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, हुजुर अली, रा. चौबे ले आऊट सरस्वती नगर, काटोल याचे घरी गांजा या अंमली पदार्थांची अवैध्यरित्या विक्रीकरीता साठवणुक करून ठेवलेला आहे. काटोल पोलीसांनी कारवाई करत मिळालेल्या माहीतीच्या आधारे घटनास्थळी जावुन सापळा रचुन **आरोपी नामे १) सुलतान उर्फ साहील यावर अली जाफरी, वय १९ वर्ष, २) महिला आरोपी दोन्ही रा. चौबे लेआऊट, सरस्वती नगर, काटोल, त.काटोल, जि. नागपूर** यांच्या घराची कायदेशीररित्या पंचासमक्ष घरझडती घेतली असता अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. **पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन** १) अंमली पदार्थ गांजा वजन ०१ किलो ०६७ ग्रॅम किंमती १८,६४७/– रुपये २) नगदी १,०५,०००/– रूपये वजन काटा व ईतर साहित्य असा एकुण १,२३,६४७/– रूपयांचा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करण्यात आला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपी नामे १) सुलतान उर्फ साहील यावर अली जाफरी, वय १९ वर्ष, २) महिला आरोपी दोन्ही रा. चौबे लेआऊट, सरस्वती नगर, काटोल, त. काटोल, जि. नागपूर याच्याविरूद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास काटोल पोलीस करीत आहेत.**



## पर्यावरणास अपायकारक तसेच जिवीतास धोकादायक असणारा प्रतिबंधीत नायलॉन मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोस्टे मौदा :—** दिनांक ११/०१/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **आरोपी शेख सोहेल शेख रशीद, वय २३ वर्ष, रा. पारडी नागपूर** हा नायलॉन मांजा स्वत: जवळ बाळगुन गुमथळा शिवार येथील बाजारात विक्री करिता येणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस पथकाने तात्काळ सापळा रचत कारवाई केली आणि आरोपीची पंचासमक्ष झडती घेतली असता आरोपी कडे असलेल्या थैली मध्ये नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीमध्ये गुंडाळलेला मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून मोनोकाईट कंपनीचा एकुण ०४ नग नायलॉन मांजा प्लॉस्टीक चक्रीसह किंमती ३२००/— रूपये असा एकुण ३२००/— रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन मौदा येथे कलम १२५, २२३ भा.न्या. सं. सहकलम ५, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ३ गुन्हे नोंद

पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत जलालखेडा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्रं १) विलास गजानन मानेकर, वय ३६ वर्ष रा. वार्ड क्रं ३, जलालखेडा हा पशु वैदयकीय दवाखान्या जवळ जलालखेडा परिसरात सार्वजनीक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. काटोल पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी क्र. २) मोहन अजाब सावंत, वय ३० वर्ष, रा. श्रीरामनगर काटोल, काटोल ३) रामदास श्यामलालजी बरदे, वय ७० वर्ष, रा. पेठबुधवार काटोल हे तळयाची पार अन्नाभाउ साठे नगर काटोल येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये प्रत्येकी १ असे ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०३ गुन्हे नोंद

दिनांक १०/०१/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू असा एकुण ८००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत आरोपी अश्वीन रामदासजी राउत, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र १७, नरखेड, तह. नरखेड, जि नागपुर** याचेवर १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर **अंतर्गत आरोपी हरीचंद्र पुंडलीकराव कडु, वय ४६ वर्ष, रा. खोरगडे ले आउट, वार्ड क्र १४, कळमेश्वर, जि. नागपुर** याचेवर **१ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद आहे अशा ०३ **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ३ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक<br>
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर<br>
यांच्या मान्यतेने